**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव– गंगाराम बाबूराव मयेकर
वय –२७ वर्षे, व्यवसाय – नोकरी
रा.खानोली, घोगळेवाडी, ता.वेंगुर्ला. जि.सिंधुदुर्ग

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–</u>**

मी माझ्या आईसोबत वरील ठिकाणी राहतो. अपघातापुर्वी मी माझे वडील बाबूराव उर्फ बाबलो व आई असे राहत होतो. माझे वडील शेती व मोलमजूरी करत होते. सदरचा अपघात हा दि. २१/०६/२०२२ रोजी घडला. त्यावेळी मी कामासाठी वेतोरा येथे होतो. वडील गुरांना चार आणण्यासाठी जातो असे आईला सांगून गेले. त्यानंतर घरी येत असताना दाभोली येथील मोरेश्वर बांधवलकर यांच्या घराजवळील रस्त्यावर येत असताना समोरील येणाऱ्या डंपरने धडक देवून अपघात केला. सदरची घटना घडल्यानंतर माझ्या मित्राने मला फोनवरुन कळविले. त्यामुळे मी घटनास्थळी आलो. माझ्या माहितीप्रमाणे सदरचा अपघात हा दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास झाला.

०२. मी घटनास्थळी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास पोहोचलो. मी घटनास्थळी पोहोचल्यावर माझे वडील रस्त्याच्या मधोमध मृतावस्थेत पडल्याचे मला दिसून आले. त्यावेळी वडीलांच्याजवळ चाऱ्याची पेंडी बाजूला पडली होती. ज्या डंपरने धडक दिली तो रस्त्याच्या मधोमध वेंगुर्ला दिशेने तोंड करुन उभा होता. सदर डंपरचा क्रमांक केए–७०–३०८७ असा होता. सदर डंपर चालकाचे नाव विनायक राऊळ असे होते. त्याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे. त्यानंतर घटनास्थळी पोलीस आले व त्यांनी पंचनामा केला. त्यानंतर मी वेंगुर्ला पोलीस स्टेशनमध्ये येथे जावून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. (साक्षीदाराला फिर्याद दाखविण्यात आली.) त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(फिर्यादीला <u>निशाणी–पी–१/पीडब्ल्यू १</u> देण्यात येते.)**

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस.एस.कुळकर्णी यांच्यामार्फत सुरु–</u>**

०३. अपघात झाला तो रस्ता वळणावळणाचा आहे. अपघाताचा रस्ता हा वळणावळणाचा असल्याने समोरुन गाडी आल्यास आपल्या गाडीचा वेग कमी करावा लागतो व

त्यानंतर गाडी पुढे घेता येते. हे म्हणणे खरे आहे की अपघाताच्या ठिकाणापासून रस्त्याच्या कडेने वाड्यामध्ये जाणारे छोटे मोठे रस्ते आहेत. हे म्हणणे खरे आहे की  सदरचा अपघात मी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. सदरचा अपघात मी प्रत्यक्ष पाहिलेला नसल्याने अपघाताच्या वेळी गाडीचा वेग किती होता किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. अपघाताच्यावेळी गाडीमध्ये किती लोक होते हे मला सांगता येणार नाही. अपघातग्रस्त डंपर कोणाच्या मालकीचा होता हे मला माहीत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की सदरचा डंपर कोणाच्या मालकीचा होता हे मला इतर लोकांकडून कळाले. अपघातग्रस्त ठिकाणी हळदणकरवाडी येथे आजूबाजूला लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे  नाही की डोक्यावर चाऱ्याची पेंडी घेवून चालताना समोरचे दिसत नाही. मी जबाब देतेवेळी माझे वडील रस्त्याच्या कोणत्या बाजूने चालत होते हे सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडिलांना वयोमानानुसार ऐकण्यास कमी येत होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पुर्ण जबाबामध्ये माझ्या वडिलांनी डंपरच्या कोणत्या भागाने ठोकरले हे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की अपघातग्रस्त ठिकाणी वाहनांची नेहमी वर्दळ चालू असते. माझी व आरोपीची पुर्वीपासून कोणतीही ओळख नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला नाहक गुन्ह्याच्याकामी गोवण्यासाठी मी त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की इतर लोकांच्या सांगण्यावरुन मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी कोणालातरी आरोपी करायचे या अनुषंगाने मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर  स्विकृत,

सही/-

दिनांक- १२/०८/२०२४

(डी.वाय.रायरीकर)

न्यायदंडाधिकारी   वर्ग १, वेंगुर्ला.